**Indian Streams Research Journal**
**Vol -3 , ISSUE –3, April.2013**
**ISSN:-2230-7850**

Available online at www.isrj.net

ORIGINAL ARTICLE

# ग्रामीण भागाच्या विकासात विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याचे योगदान : एक भौगोलिक अभ्यास

**रेडे एच. एन. , पाटील सुहास पांडूरंग**
असोसिएट प्राध्यापक, श्री. छत्रपती शिवाजी कॉलेज, उमरगा. प्रा. गायकवाड सुभाष माणिकराव, सहाय्यक प्राध्यापक, मा.ह. महाडीक महाविद्यालय, मोडनिंब
सहाय्यक प्राध्यापक- मा.ह. महाडीक, महाविद्यालय, मोडनिंब जि. सोलापूर.

**प्रस्तावना :**

भारत हा कृषीप्रधान देश आहे. देशातील सुमारे ७१% पेक्षा जास्त लोक कृषीशी निगडीत व्यवसायात गुंतलेले आहेत. राष्ट्रीय उत्पन्नात शेतीतील उत्पन्नाचे प्रमाण १७.१% आहे. शेतीमध्ये अनेक पिकाचे उत्पादन घेतले जाते त्यापैकी ऊस हे एक नगदी पीक आहे. ऊस हा वजन कमी होणारा कच्चा माल असल्याने ऊसावर प्रक्रिया करणारे उद्योग (साखर, व गुळ तयार करणारे उद्योग) ऊस क्षेत्रात उभारले जातात. महाराष्ट्रातील पहिला सहकारी साखर कारखाना अहमदनगर जिल्ह्यातील प्रवरानगर येथे स्थापन झाला. तेव्हा पासून ग्रामीण भागाच्या विकासाचे साधन म्हणुन साखर कारखान्याकडे पाहीले जाते.

महाराष्ट्र हे राज्य भारतात ऊस उत्पादनात अग्रेसर आहे. महाराष्ट्रातील एकूण ३५ जिल्ह्यांपैकी सोलापूर जिल्हा ऊस उत्पादन घेणारा अग्रेसर जिल्हा आहे. सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यात १९९७ पूर्वी एक ही साखर कारखाना नव्हता. पण भिमा-सिना जोडकालव्यामुळे माढा तालुक्यात सिंचन क्रांती झाली. त्यामुळे तालुक्यात ऊसाखालील क्षेत्रे वाढले परिणामी तालुक्यात आज चार साखर कारखाने सुरु आहेत त्यापैकीच पिंपळनेरचा विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना हा एक आहे. या कारखान्यामुळे माढा तालुक्यातील ग्रामीण भागाचा कायापालट झालेला आहे. त्यावर प्रकाश टाकणारा हा शोध निबंध आहे.

**Indian Streams Research Journal**
**Vol -3 , ISSUE –3, April.2013**
**ISSN:-2230-7850** Available online at www.isrj.net

**अभ्यास क्षेत्र :**

प्रस्तुत शोधनिबंधासाठी सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुक्यातील पिंपळनेर येथील विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखान्याची निवड करण्यात आली. पुर्वी सोलापूर जिल्ह्यातील माढा तालुका हा मागासलेला भाग म्हणून परीचित होता पण आता या भागात साखर कारखाने सुरु झाल्याने तालुक्याचा कायापालट झालेला आहे. माढा तालुक्याचा आक्षवृत्तीय व रेखावृत्तीय विस्तार पुढील प्रमाणे आहे.



Fig. No. 1

**अक्षवृत्तीय विस्तार :** १७° ८८' उत्तर ते १८°१०' उत्तर अक्षवृत्त आणि **रेखावृत्तीय विस्तार :** ७५°१३' पूर्व ते ७५°४६' पूर्व रेखावृत्त असा आहे. माढयाचे क्षेत्रफळ १५३८.४ चौ. कि.मी असून तालुक्याची लोकसंख्या २,६९,८३४ इतकी आहे त्यात १,४०,५०९ पुरुष व १२९३२५ स्त्रीया आहेत.

सोलापूर जिल्ह्यात ऊसाखालील क्षेत्र ६५७०४ हेक्टर असून त्यापैकी माढा तालुक्यात सन २०११-२०१२ मध्ये १७६१० हेक्टर आहे. सोलापूर जिल्ह्यात माढा तालुक्याचे स्थान उत्तर मध्ये असून माढा तालुक्याच्या पूर्वेला मोहोळ व बार्शी, दक्षिणेला पंढरपूर व माळशीरस, उत्तरेला करमाळा तालुका व उस्मानाबाद जिल्हा आणि पश्चिमेला पुणे जिल्हा आहे.

माढा तालुक्यात रेगुर प्रकारची काळी कसदार कापसाची जमीन आहे. तसेच जांभी, गाळाची व रेताड जमिनीचे क्षेत्र ही कांही प्रमाणात आढळते. तालुक्याच्या मध्य भागातून सीना जोड कालवा सुरु झाल्यावर तालुक्यात ऊसाच्या उत्पादनात विक्रमी वाढ झाल्याने तालुक्यात साखर कारखाने सुरु झाले. त्यामुळे ग्रामीण भागाच्या विकासाला नव संजीवनी मिळाली.

**गृहितके :**

ग्रामीण भागाच्या विकासात साखर उद्योगाची भूमीका अभ्यासताना पुढील गृहितके विचारात आली आहेत.

१) माढा तालुक्यातील पीक पध्दतीत बदल झाला आहे.
२) ऊसाखालील क्षेत्रात वाढ झाली आहे.
३) माढा तालुक्यातील बेरोजगारी कमी होण्यास मदत झाली आहे.
४) शेतकऱ्यांच्या राहणीमनात बदल झाला आहे.
५) साखर उद्योगाशिवाय इतर उद्योगाचा विकास झालेला आहे.

**उद्देश :-**

१) साखर उद्योगामुळे तालुक्यातील ग्रामीण भागाचा विकास विचारात घेणे व साखर उद्योगाच्या समस्या अभ्यासणे.

२) विठ्ठलराव शिंदे कारखान्याची दैनिक गाळप क्षमता विचारात घेणे.

३) माढा तालुक्याच्या विकासात कारखान्यांची भूमिका अभ्यासणे.

४) ऊस शेतीच्या सिंचन पध्दतीच्या बदलण्याचा अभ्यास करणे.

५) ऊसापासून साखरे बरोबर इतर उपपदार्थाचे उद्योग सुरु झालेत का नाही याचा अभ्यास करणे.

६) तालुक्यातील लोकांच्या राहणीमानाचा आढावा घेणे.

**बीज संज्ञा :**

साखर उद्योगामध्ये तालुक्याचा विकास झाला, इतर उद्योगांचा विकास, पीक प्रारुपात बदल, बेरोजगारांना काम लोकांचे राहणीमान उंचावले.

**संशोधन पध्दती व माहिती संकलन :**

माढा तालुक्यातील ग्रामीण भागाच्या विकासात साखर उद्योगाची भूमिका, अभ्यासत असताना मिळालेली माहिती व आकडेवारी प्राथमिक व द्वितीय स्त्रोतामधून मिळालेली आहे. प्राथमिक आकडेवारी कारखान्यास प्रत्यक्ष भेट देऊन तेथील लोकांना कांही प्रश्न विचारून माहितीचे संकलन केले. मिळालेली माहिती एकत्रीत करुन या माहितीचे विश्लेषण व वर्गीकरण करुन निष्कर्ष काढण्यात आला.

**विषय विवेचन :**

| अ.क्र. | वर्ष | सभासद संख्या | उत्पादीत साखर | ऊसक्षेत्र हेक्टर आर | सरासरी साखर उतारा टक्केवारी | दैनंदिन ऊस गाळणक्षमता मे.टन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | २००५-०६ | ९७५६ | ६०१४९८ | ५१७६ | ११.९४ | २५०० |
| २ | २००६-०७ | ९९५७ | ९४२३०० | ८९३१ | ११.२३ | २५०० |
| ३ | २००७-०८ | १०१३९ | १०७६९०० | १२८९८० | १२.१० | ३५०० |
| ४ | २००८-०९ | १५०४९ | ६२१२७०० | ७१८६ | ११.६१ | ३५०० |
| ५ | २००९-१० | १५०४९ | १३०८५४५ | १०९४३ | ११.७४ | ३५०० |
| ६ | २०१०-११ | १५०२४ | १५९९५०० | १२५५५ | ११.४४ | ३५०० |
| ७ | २०११-१२ | १४८५५ | १६६९०५० | १४६६५ | ११.७५ | ६००० |

माढा तालुक्यात २००१ पूर्वी एकही साखर कारखाना नव्हता त्यामुळे साहजीकच ऊसाचे क्षेत्र फारच कमी हाते त्यावेळी अल्प पाण्यावर येणारे बोरीचे पीक तालुक्यात सर्वत्र घेतले जायचे. परिणामी शेतकऱ्यांचे उत्पन्न मर्यादित होते. जेव्हा भीमा-सिना जोड कालवा झ ाला त्यानंतर तालुक्यात ऊसाचे क्षेत्र वाढले. परिणामी ऊस हा वजन घटणारा कच्चा माल असल्याने ऊस क्षेत्रात विठ्ठलराव शिंदे सह. साखर कारखाना पिंपळनेर येथे २००१ मध्ये सुरु झाला तेव्हा पासून खऱ्या अर्थाने तालुक्याच्या विकासाला चालना मिळाली. सध्या माझा तालुक्यातील एक नव्हे चार साखर कारखाने आहेत त्यामुळे ग्रामीण भगाचा विकास होत असल्याचे पुढील बाबींवरुन स्पष्ट होते.

विठ्ठलराव शिंदे सह. साखर कारखान्याचा २०११-१२ चा ऊस गळीत हंगाम दि.२६/१०/२०११ रोजी झाला व या हंगामात १४,२१,१६६-५५५ मे.टन ऊसाचे राज्यात उच्चांकी गाळप (नंबर वन) करुन सरासरी साखर उतारा ११.७५ मिळाला आहे व १६,६९,०५० क्विंटल साखर उत्पादन झाले.

ऊस तोडणी वाहतुकीसाठी ४७ ट्रॅक्स ३६८ ट्रॅक्टर्स व १२३० बैलगाड्या अशी यंत्रणा आहे. या क्षेत्रात कार्य करणाऱ्या सर्व व्यक्तीला त्यांच्या कामाच्या स्वरुपात मोबदला मिळाल्याने त्याच्या उत्पन्नात नक्कीच वाढ झाली आहे. कारखान्यामध्ये सुमारे ८०० कर्मचारी व अधिकारी वर्ग आहे. त्यांना सुमारे कमीत कमी ३०००/- ते जास्तीत जास्त १५०००/- रु. प्रति महिना प्रमाणे पगार आदा केला जातो.

**शेती विकासाच्या योजना :-**

१) **खोडवा व्यवस्थापन :** कार्यक्षेत्रात अनेक ठिकाणी पाण्याची टंचाई निर्माण झाल्याने खोडवा ऊसामध्ये पाचट ठेवण्याची योजना कारखान्याने राबवली. पाचट ठेवणाऱ्या सभासदांना प्रति एकरी १ बॅग सिंगल सुपर फॉस्फेट व १ लिटर डिंकपोझिंग कल्चर मोफत दिले.

२) **बेणे योजना :-** कार्यक्षेत्रातील सभासदांना उत्तम प्रतिचे ऊसाचे बेने व्ही.एस. आय. पुणे पाडेगांव कृषी केंद्र व कृषी महाविद्यालय पुणे कडून पुरवठा केले.

३) **ठिबक सिंचन संच वाटप :-** कारखान्यामार्फत शेतकऱ्यांना ऊस पिकासाठी ठिबक सिंचन संच वेगवेगळ्या कंपन्यांमार्फत पुरवठा केले.

४) **रासायनिक खत :-** कारखान्यास ऊस पुरवठा करणाऱ्या सभासदास नोंदीच्या प्रमाणात प्रति एकर ८ पोती १०:२६:२६/ १२:३२:१८-८ पोती युरिया तसेच ८ बॅगा बायोकंपोस्ट वाटप केले.

५) **कंपोस्ट खत वाटप :-** कारखान्यामधून निघणारे प्रेसमडपासून तयार केलेले उत्तम प्रतिचे कंपोस्ट खत ऊस उत्पादकांना त्यांच्या क्षेत्राप्रमाणे उधारीवर दिले.

तसेच सुक्ष्म अन्नद्रव्य योजना, माती व पाणी तपासणी प्रयोगशाळा, बायोकंपोष्ट बॅगा वाटप योजनांच्या माध्यमातून शेतकऱ्यांना सहकार्य करण्याचे धोरण कारखान्याचे आहे.

पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी शेतकऱ्यांना आर्थिक मदत करण्याच्या हेतुने कारखान्याने फळ झाडे लावा रक्कम दुप्पट मिळवा योजना हाती घेतली.

**सामाजिक कार्य :-**

सामाजिक बांधिकलकीतून सामुदायिक विवाह सोहळा, रक्तदान शिबीर, अपंग उपचार, नेत्रदान चिकित्सा व मोतिबिंदू शस्त्रक्रिया, शिबीर, मोफत रक्तदाब व मधूमेह तपासणी या मार्गातून शेतकऱ्यांना सहकार्य करण्याचा प्रयत्न केला जातो. तसेच जेष्ठ नागरीकांना

काशी यात्रेचे आयोजन करुन सुमारे ५००० नागरिकांना काशी दर्शन घडवले. मोफत बुध्दगया, मोफत माऊंट आबु यात्रेचेही आयोजन देवून परिसराचा व तालुक्याचा आर्थिक सामाजिक विकास विठ्ठलराव शिंदे कारखान्यांमुळे साकार झाला हे नमुद करावेसे वाटते.

**सहाय्यक प्रकल्प :-**

कारखान्यात डिस्टिलरी प्रकल्प, रिफायनरी शुगर प्रोजेक्ट आणि वीजनिर्मीती प्रकल्प असे सहाय्यक प्रकल्प आहेत. सहविजनिर्मीती प्रकप्लात २८ मे. वॅट पर्यंत विजनिर्मीती केली जाते. डिस्टिलरी प्रकल्प हा ३०,००० एल.पी.डी. क्षमतेने चालतो.

**भविष्यातील योजना:-**

१) प्रतिदिन गाळपक्षमता ६००० मे. टनावरून ८५०० मे. टन विस्तारवाढ करणे.
२) सहविजनिर्मीती प्रकल्प २८ मे. वॅट वरून ३८ मे.वॅट पर्यंत विस्तारवाढ करणे.
३) आसवणी प्रकल्प ३०,००० लि. वरुन ६०,००० लि. पर्यंत विस्तारवाढ करणे.

**कारखान्यापुढील समस्या :-**

१) अवेळी पावसामुळे ऊसातील साखरेच्या प्रमाणात घट.
२) बँकाकडून कारखान्यास मिळणारी अपूरी उचल.
३) साखर दराची व साखर निर्यातीची अनिश्चितता.
४) वाढत्या महागाईमुळे उत्पादन खर्चात होणारी वाढ
५) पूर्ण क्षमतेने गाळप करुन ही अतिरिक्त ऊस राहतो.
६) ऊस तोड कामगारांची कमतरता दिवसेंदिवस वाढत आहे.

**शिंदे कारखान्यांच्या समस्यावरील उपाय :-**

१) साखरेचा वस्तुस्थितीवर आधारित खर्च विचारात घेऊन आधारभूत किंमत द्यावी.
२) कारखान्यास बँकेकडून मुबलक भांडवल उपलब्ध करुन द्यावे.
३) कारखान्याची गाळप क्षमता वाढवावी.
४) ऊसतोड कामगाराऐवजी कारखान्याने वाहतुकदारांना ऊसतोडीचे मशीन पुरवठा करावे.
५) पेट्रोलमध्ये २५% इथेनॉन मिसळण्याची सक्ती करुन इथेनॉलला ५०/- रु.प्रतिलिटर दर द्यावा.
६) साखर निर्यातीवरील निर्बंध उठवावे.
७) ऊस उत्पादनवाढीसाठी शेतकऱ्यांना योग्य मार्गदर्शन करावे.

**निष्कर्ष :-**

१) माढा तालुक्यात भिमा-सीना जोडकालव्यामुळे इतर पिकांचे क्षेत्र घटून ऊसाचे क्षेत्र वाढले आहे.
२) विठ्ठलराव शिंदे कारखान्यामुळे तालुक्यातील बेकारीचे प्रमाण नक्कीच कमी झालेले आहे.
३) ऊसाला चांगला भाव मिळाल्याने तालुक्यातील शेतकऱ्यांचे राहणीमान उंचावले आहे.

४) साखर कारखान्यामुळे तालुक्यात इतर अनेक सहाय्यक प्रकल्प सुरु झाल्याने ग्रामीण भागाचा विकास झाला.

५) बदलत्या हवामानामुळे पावसाचे प्रमाण कमी झाल्याने तालुक्यात ठिबक सिंचनाचा अधिक अवलंब केला जात आहे.

**संदर्भ :**

१) ॲग्रोवन- विविध अंक

२) कारखान्यांचे वार्षिक अहवाल-२०११-१२

३) भारताचा भूगोल- के.ए. खतीब

४) भारताचा भूगोल -प्रकाश सावंत

५) महाराष्ट्राचा नकाशा

६) इंटरनेटवरून माहिती